दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ६४ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# प्राजक्ता माळीला गलिच्छ राजकारणात ओढू नका हा महाराष्ट्राच्या संस्कृतीला बट्टा लावण्याचा प्रकार

## सुरेश धसांनी माफी मागावी-प्राजक्ता माळी

**मुंबई (वृत्तसंस्था)-भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना अभिनेत्री प्राजक्ता माळीचा उल्लेख केला होता. यावरूनच राजकारणात कलाकारांना का खेचता? असा सवाल अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने सुरेश धस यांना केला आहे. या प्रकरणावर शांत राहा, असे मला सर्वांनी सांगितले. या सर्व आवया येतात आणि निघून जातात. चिखलफेक होऊ नये, म्हणून मी इतके दिवस शांत बसले. परंतु, लोकप्रतिनिधी आपल्यावर चिखलफेक करतात, त्यावेळी बोलणे गरजेचे आहे, असे प्राजक्ता माळी म्हणाली. या प्रकरणी मी महिला आयोगाकडे तक्रार केली असल्याचे प्राजक्ता माळी यावेळी सांगितले. आमचे कलाक्षेत्र बदनाम नाही, परंतु, अशा माणसांमुळे आमचे कलाक्षेत्र बदनाम होते, असेही तिने सांगितले. ती आज पत्रकार परिषदेत बोलत होती.**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीच्या नावाचा उल्लेख केला होता. अभिनेत्री प्राजक्ताताई माळी आमच्याकडे येतात. आम्ही परळीत बघत असतो, रश्मिका मंधाना, सपना चौधरी येत असतात. ज्यांना इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचं शिक्षण घ्यायचे असेल त्यांनी परळीत यावे. प्राजक्ता माळीही आमच्याकडे येत असतात. त्यांचा अतिशय जवळचा पत्ता सापडायचा असेल, तर आमचा परळी पॅटर्न बघितला पाहिजे, असे सुरेश धस यांनी म्हटले होते.एका सांस्कृतिक कार्यक्रमात सत्कार स्वीकारताना काढलेला एक फोटो, ती आमची एकमेव भेट आणि धन्यवाद या एकमेव शब्दावरून एवढी आरोळी उठवावी? असा सवाल प्राजक्ता माळीने केला. माझ्यावर माझ्या सोबतच्या लोकांचा विश्वास होता. ती माझी जमेची बाजू होती. त्यामुळे मला माझ्या चारित्र्यावर स्पष्टीकरण देण्यासाठी समोर येण्याची गरज वाटली नाही. आज आलेली वेळी नामुष्की आहे. एक लोकप्रतिनिधी टिपण्णी करतात, त्यामुळे ही वेळ आली आहे, अशी खंत प्राजक्ता माळीने व्यक्त केली.मी विनंती करते तुमच्या वैयक्तिक राजकारणासाठी महिला कलाकारांची नावं घेणं बंद करा. हे महाराष्ट्रातल्या राजकारण्यांना शोभत नाही. सुरेश धस यांनी




विनम्रपणे माझी माफी मागावी. मी आज महिला आयोगाकडे तक्रार केली आहे. त्यांनी योग्य ती कारवाई करावी. मीदेखील कायदेशीर कारवाई करत राहीन. मा. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना मी विनंती करते. माझी आई झोपलेली नाही. माझ्या भावाने सगळे सोशल मीडिया अकाऊंट्स डिलीट केलेत. माझ्या कुटुंबावरही याचा अत्यंत वाईट परिणाम होतोय. या सगळ्याला तोंड देणं हे अजिबात सोपं नाही. मुख्यमंत्र्यांनी मी विनंती करते की त्यांनी याबाबत ठोस कारवाई करावी, असे प्राजक्ता माळी म्हणाली.

### राजकारणात कलाकारांना का घेता?

**माझा सुरेश धस यांना बेसिक प्रश्न आहे. तुम्ही राजकारणी आहात, आम्ही कलाकार आहोत. तुम्ही तुमचे राजकारण करा, पण आम्हाला कलाकारांना मध्ये का घेता? परळीला केवळ महिला कलाकारच येतात का, पुरुष कलाकार कधी गेलेच नाहीत का? महाराष्ट्रातील राजकारण्यांना हे शोभत नाही, तुम्ही महिला कलाकारांच्या चारित्र्यावर संशय घेत नाहीत, तर त्यांच्या कर्तृत्वावर देखील प्रश्न उपस्थित करतात, असे म्हणत प्राजक्ता माळीने आमदार सुरेश धस यांच्यावर जोरदार पलटवार केला. कुठल्या राजकारण्यांच्या कुबड्यांशिवाय एखादी महिला स्वकर्तृत्वावर यशस्वी होऊ शकत नाही का? अशी टिप्पणी करून तुम्ही स्वतःची मानसिकता दाखवत आहात. ही खेदजनक बाब आहे, असेही प्राजक्ता माळीने यावेळी नमूद केले.**

# मुल तहसील कार्यालयासमोर रितिक शेंडे युवकाची हत्या

## शहरात तणाव, चक्काजाम आंदोलन





**मुल । प्रतिनिधी**

मुल तहसील कार्यालयासमोर शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास रितिक शेंडे (वय २६) या युवकाची तीन ते चार युवकांनी हत्या केली. शहरातील तीन महिन्यातील ही दुसरी हत्येची घटना असून, हत्येमुळे मुल शहरात तणाव निर्माण झाला आहे. शुक्रवारी रात्री नागरिकांनी मुल पोलीस ठाण्यात जमून आरोपींच्या अटकेची मागणी केली.

शनिवारी शवविच्छेदनानंतर संतप्त नागरिकांनी मूल तहसील व पंचायत समिती जवळ मृतदेह ठेऊन चक्काजाम आंदोलन केले, ज्यामुळे चंद्रपूर-गडचिरोली मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. पोलिसांनी आरोपी राहुल पासवानसह तीन आरोपींना अटक केली असून, अन्य आरोपी फरार आहेत.घटनेच्या तपशिलानुसार, रितिक मूल तहसील कार्यालयासमोर बस थांब्यात रात्री १० वाजता बसलेला होता. त्याचवेळी तीन-चार युवक आले आणि त्याच्याशी वाद घातला, जो हाणामारीत बदलला. आरोपींनी चाकूने वार करून रितिकला गंभीर जखमी केले. घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतल्यावर रितिकला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेनंतर कुटुंबीय, समाज बांधव आणि नागरिकांनी घटनास्थळी आणि पोलीस ठाण्यात गर्दी केली. शनिवारी सकाळपासून उपजिल्हा रुग्णालयात स्थानिक नागरिकांची आणि कुटुंबीयांची मोठी गर्दी होती. आरोपींना अटक करण्याची मागणी केली जात आहे. हत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे आणि पुढील तपास सुरू आहे.रितिक शेंडे हत्येच्या निषेधार्थ शनिवारी मुल शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. बाजारपेठ शंभर टक्के बंद होती. मुलमध्ये वाढलेली गुन्हेगारी, चरस आणि गांजाच्या विक्रीच्या वाढीमुळे नागरिकांत असंतोष आहे. स्थानिक पोलिसांच्या दुर्लक्षामुळे गुन्हेगारी वाढल्याचा आरोप केला जात आहे.दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले असून, उपजिल्हा रुग्णालय आणि गांधी चौकात पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. तीन महिन्यांपूर्वी मुलमध्ये प्रेम चरण कामडे याचीही हत्या झाली होती, तसेच चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोष रावत यांच्यावर गोळीबार झाला होता.मुख्य आरोपी राहुल सत्तन पासवान (वय २०), अजय दिलीप गोटेफोडे (वय २२) आणि एक अल्पवयीन आरोपी यांना चंद्रपूर शहरातून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.




# श्रीरामपूर येथे सिद्धिविनायक फर्निचर कारखान्याला आग; लाखोंचे नुकसान

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर एमआयडीसीत असणाऱ्या सिद्धीविनायक फर्निचर या कारखान्याला आग लागल्याने या कारखान्यातील कोट्यावधी रुपयांचा माल जळून खाक झाला आहे. सुमारे ३ ते ४ तासांच्या अथक परिश्रमानंतर ही आग आटोक्यात आली. आगीचे कारण मात्र समजू शकले नाही. मात्र, शॉर्टसर्किट अथवा वेल्डींगमुळे ही आग लागली असावी, अशी चर्चा आहे.

श्रीरामपूर एमआयडीसीत कैलास शिंदे यांचा सिद्धीविनायक फर्निचर कारखाना आहे. २० गुंठ्यात असलेल्या या कारखान्यात फर्निचर तयार केले जातात. त्यात सोफासेट, टेबल, कॉट, आदी साहित्य बनवले जाते. त्यासाठी लागणारे प्लायवूड, फोम तसेच लेदरचे कव्हर असा मोठ्या प्रमाणावर कच्चामाल या ठिकाणी होता. तसेच तयार फर्निचरही मोठ्या प्रमाणावर होते. शुक्रवारी नेहमीप्रमाणे ९ वाजता कारखाना सुरू होत असताना व कामगार येत असताना अचानकपणे या कारखान्याला आग लागली.

लाकडी साहित्य, फोम आणि लेदरचे साहित्य असल्याने आगीने मोठा पेट घेतला. आग लागल्यानंतर काही मिनिटांत आगीने रौद्ररूप धारण केले. आग लागल्याचे कळताच तातडीने अग्निशामक दलाच्या गाड्यांना बोलावण्यात आले. त्यात सुरूवातील श्रीरामपूर नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे वाहन आले. त्यानंतर अशोक कारखाना तसेच देवळाली प्रवरा नगरपालिका, राहाता नगरपालिका, गणेश कारखाना, संजीवनी कारखाना आदी ठिकाणच्या अग्निशामक गाड्या आग विझविण्यासाठी त्या ठिकाणी आल्या.

सुमारे १० ते १५ गाड्यांनी या ठिकाणी या कारखान्याची आग विझवली जात होती. मात्र, आग आटोक्यात येत नसल्याने शेवटी सिद्धार्थ मुरकुटे आणि एमआयडीसी कारखान्याचे बाबासाहेब काळे यांनी गोदावरी बायोरिफायनरी येथे फोन करून आग विझवण्यासाठीच्या धुराचे अग्निशमन वाहन पाचारण करण्यात आले. हे वाहन आल्यानंतर मात्र, आग जवळपास ८०-९० टक्के आटोक्यात आली. कोट्यावधी रुपयांच्या साहित्य, मशिनरीचे नुकसान झाल्याचे समजते.



# ३१ डिसेंबरला भारत बंद

## बहुजन समाजाचा एकत्रित लढा

### बहुजन समाजाने पुकारलेल्या भारत बंदची तयारी अंतिम टप्प्यात

**भंडारा । प्रतिनिधी**


देशातील विविध सामाजिक, आर्थिक आणि राजकीय मागण्यांसाठी बहुजन समाजाच्या नेतृत्वाखाली ३१ डिसेंबर २०२४ रोजी भारत बंदची हाक देण्यात आली आहे. बहुजन समाजाच्या प्रमुख संघटनांनी एकत्र येत या आंदोलनाला व्यापक स्वरूप दिले आहे. मागण्यांमध्ये शैक्षणिक आरक्षण, जातिनिहाय जनगणना, महिला आरक्षण विधेयकात ओबीसी आरक्षणाची तरतूद, आणि शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी यांचा समावेश आहे.या बंदला देशभरातील बहुजन संघटनांचा पाठिंबा मिळाला असून, बंदच्या आयोजनासाठी सर्व स्तरांवर तयारी सुरू आहे. मुख्य शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत जनजागृती मोहीम राबवली जात आहे. बंदमुळे शैक्षणिक संस्थांपासून ते सरकारी कार्यालयांपर्यंत कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

बहुजन नेत्यांनी शांततामय मार्गाने बंद यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. हा लढा केवळ अधिकारांसाठी नाही, तर देशात सामाजिक समतोल प्रस्थापित करण्यासाठी आहे, असे एका नेत्या ने स्पष्ट केले.बंदच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस आणि प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.हा बंद बहुजन समाजाच्या हक्क आणि अस्तित्वाचा लढा आहे, असे नेत्यांनी म्हटले असून, सरकारने मागण्या मान्य न केल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

# पतंग उडविताना विहिरीत पडून लहान मुलांचा मृत्यू

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पोखर्डी येथे पतंग उडविताना विहिरीत पडून दोन लहान मुलांचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास घडली. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अनिकेत रत्नदीप आल्हाट, (वय १२), दिनेश विशाल देठे, (वय ९. दोघे रा, पोखर्डी ता. जि. अहिल्यानगर), अशी मयत मुलांची नावे आहेत. याबाबत माहिती अशी की, पोखर्डी येथील दर्याबाई परिसरात अनिकेत व दिनेश हे दोघे पतंग उडवीत असताना पतंग विहिरीत पडला. तो पकडण्यासाठी पळाले असता एक जण विहिरीत पडला. त्याला वाचविण्यासाठी दुसरा मुलगा पळाला. तो ही विहिरीत पडला. येथे जवळ असलेल्या इतर लहान मुलांनी आरडाओरडा केला. तेव्हा तेथील नागरिकांनी धाव घेतली. त्या मुलांना



विहिरीतून बाहेर काढत जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारापूर्वी मयत घोषित केले. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# शिर्डीत भाजप प्रदेश अधिवेशना साठी जय्यत तयारी;बावनकुळे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे नियोजित प्रदेश अधिवेशन १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे संपन्न होणार असून, या अधिवेशनाच्या तयारीसाठी शिर्डीत जोरदार तयारी सुरू आहे. महसूल मंत्री आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत आज जिल्हा कोअर टिमची आढावा बैठक पार पडली.

बैठकीत भाजपाचे आमदार आणि प्रदेश पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी कोणताही सत्कार न करता माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनासंबंधी चर्चा करण्यात आली असून, कार्यकर्त्यांच्या सहभागासाठी विशेष तयारी करण्यात येत असल्याची माहिती मिळाली आहे.

# आठवी विदर्भ स्तरिय टेबल टेनिस स्पर्धा यशस्वी

**भंडारा । प्रतिनिधी**

स्व. डॉ. पुरुषोत्तम केशव दक्षणिकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ व टेबल टेनिस असोसिएशन व भंडारा वेटर्न्स टेबल टेनिस ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने ८ वी विदर्भ स्तरिय मास्टर्स टेबल टेनिस स्पर्धा शिव छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल भंडारा येथे नुकतीच पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन शुभांगी मेंढे यांच्या हस्ते, अध्यक्षस्थानी दुरग येथील वेटरनरी युनिव्हर्सिटीचे व्हाईस चान्सेलर डॉ. एम. पी. दक्षणिकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून टेबल टेनिस चे प्रशिक्षक अजय कांबळे, लायन्स क्लबचे भरत भलगट, सिमा गोन्नाडे, विनोद भोंगाडे, किशोर गोन्नाडे, प्राचार्य नाना जोशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

त्यात पुरुष ३९ वयोगटात डॉ. मनिष बतरा, राहुल कोचर, अश्विन रामटेके, विजय धनजोडे, ४९ वयोगटात सुनिल पानबुदे, हर्षल खोब्रागडे, अजय उपाध्य, अजय निनावे, ५९ वयोगटात अशोक कांबळे, विलास बोबडे, एस. टी. दिवसे, उल्हास रंगारी, ६४ वयोगटात राजेश कांबळे, एल. बी. राणा, सिध्दार्थ कोन्नाडे, मुकूंद कांबळे तर महिला ३५ व पुढील गटात स्नेहल भोले, स्नेहल बडे, मनिषा वंजानी, शुभांगी जुंगरे यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकाविला आहे. तसेच टीम इव्हेंट मध्ये भंडारा- अ मध्ये डॉ. मनिष बतरा, संदीप पुरंदरे, अशोक कळंबे, आनंद उके, पांडे लेआऊट- अ मध्ये सुनिल पानबुडे, राजेश नवलाखे, कांबळे, मानकापूर-सी हर्षल खोब्रागडे, महेंद्र रामटेके, राजेश बजोरीया, केकेटीटीसी-अ मध्ये अजय निनावे, समीर चालकुरे, रितेश सव्वालाखे यांच्या संघाने प्रथम द्वितीय व तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकाविला आहे. विजयी स्पर्धकांना व संघाला रोख रक्कम व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.त्यावेळी परिक्षक म्हणून आदित्य बैस, प्रणित उरकुडे, हिमांक बतरा, अमोग नखाते, तुषार भांडारकर, लक्षित बतरा, आर्या मोगरे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिष बतरा यांनी केले तर उपस्थितांचे आभार सीमा गोन्नाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सतिश शर्मा, संदीप पुरंदरे, डॉ. मनिष बतरा, निरज बैस, नाना भिवगडे, दीपक चड्ढा, आनंद उके, वसंत दक्षणिकर, सोहेब हुसैन, सिमा गोन्नाळे, मनिषा वंजानी टेबल टेनिस असोसिएशन व भंडारा वेटर्न्स टेबल टेनिस ग्रुपच्या पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.



# रा.तु.म.नागपूर विद्यापीठ-गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद अधिवेशनाध्यक्षपदी प्राचार्य डॉ.अजय चिकाटे यांची निवड

**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन येत्या १७ व १८जानेवारी २०२५ ला लाखनीच्या समर्थ महाविद्यालयात आयोजित करण्यात आले असून या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी-साहित्यिक आणि कला-वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर येथील प्राचार्य डॉ. अजय कृष्णराव चिकाटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल परिषदेचे अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांनी डॉ.अजय चिकाटे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार केला. परिषदेचे प्रथम अधिवेशन १९६८ मध्ये वणी येथे डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेत पार पडले होते. आतापर्यंत भ. श्री. पंडित, श्री. मा. कुळकर्णी, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. मदन कुलकर्णी, डॉ. वि. स. जोग, आचार्य अ. द. वेलणकर, डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. रवींद्र शोभणे आदी समीक्षक- प्राध्यापकांनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.



डॉ.अजय चिकाटे यांचा सत्कार करताना प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, मागील अधिवेशनाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे, परिषदेचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे व डॉ. श्याम मोहोरकर, कोषाध्यक्ष डॉ. सोपानदेव पिसे, परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. शैलेंद्र लेंडे, सहसचिव डॉ. संगीता खुरद, डॉ. मनीषा नागपुरे, डॉ. राकेश कभे, डॉ. अशोक भक्ते, डॉ. विजय राऊत, डॉ. नरेंद्र घरत, डॉ. प्रशांत सूर्यवंशी, डॉ. अनिल चिकाटे, सौ.रंजना चिकाटे आदी उपस्थित होते.



नागपूर येथील साहित्यिक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रमोद मुनघाटे महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे यांना राहुल गांधी लिखित ग्रंथ भेट देताना

# गाईचा मृत्यू : निष्काळजी गौ पालक आणि प्रशासनाला धक्का

## नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील दुर्दैवी घटना

**वर्धा । प्रतिनिधी**

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील नागठाणा चौकाजवळ एका गाभिण गाईचा एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने मृत्यू झाला. ही गाय आठ महिन्यांची गाभिण होती. या अपघातात गाईसोबत तिच्या पोटातील वासराचाही मृत्यू झाला. या घटनेने गाईंच्या सुरक्षेसाठी निष्काळजीपणाची व शासनाच्या दुर्लक्षाची समस्या पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.



गाईंना सांभाळून दूध काढणारे काही गौ पालक दूध विकल्यानंतर गाईंना लावारिस रस्त्यावर सोडतात. ही निष्काळजी वृत्ती गाईंना अनेकदा भुकेले राहण्यास व अपघातांचे बळी होण्यास भाग पाडते. अशा घटनांमुळे गाईंचे संरक्षण केवळ कागदावरच राहिले आहे, अशी टीका गौ संरक्षण कार्यकर्त्यांकडून होत आहे

गाईंची काळजी घेण्याची जबाबदारी घेणाऱ्या गौ पालकांकडून गाईंची उपेक्षा होत असल्याने यावर कठोर कारवाईची मागणी होत आहे. अशा निष्काळजी गौ पालकांवरील सर्व शासकीय योजना व आर्थिक मदत थांबवावी, अशी मागणी गौ रक्षण हिंदू दलाच्या वतीने करण्यात आली आहे.

गाईंना संरक्षण देण्यासाठी गोलू चौधरी मित्र परिवार, भाटिया कन्स्ट्रक्शन, आणि गौ रक्षण हिंदू दलाचे जिल्हाध्यक्ष किशोर सोनी यांनी महत्त्वाचा पुढाकार घेतला आहे. या घटनेनंतर प्रशासनाने तत्काळ कठोर उपाययोजना कराव्यात, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे.

# महालगाव गुरुकुलमध्ये आनंदनगरी व विज्ञान मेळावा उत्साहात साजरा

**महालगाव । प्रतिनिधी**

जगद्गुरु श्री संत जनार्दन स्वामीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली महालगाव येथील श्री संत जनार्दन स्वामी विद्यालय (गुरुकुल) मध्ये २८ डिसेंबर २०२४ रोजी आनंदनगरी व विज्ञान मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी श्री बाबाजींनी व्हिडिओ कॉलद्वारे सर्वांना शुभाशीर्वाद दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी स्वामी कैवल्यानंद गिरीजी महाराज होते. प्रमुख उद्घाटक म्हणून संस्थेचे सदस्य अंकुशजी जाधव गुरुजी, महालगाव आश्रम प्रमुख व शालेय समितीचे अध्यक्ष स्वामी नित्यानंद गिरीजी महाराज, जिल्हा परिषद सभापती अविनाश पाटील गलांडे, पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब पाटील झिंजुर्डे, तसेच विरगाव पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वाघमोडे उपस्थित होते.



विज्ञान मेळाव्यात विद्यार्थ्यांनी ४७ विविध प्रयोग सादर केले, तर आनंदनगरीसाठी ६० विविध स्टॉल मांडण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह असून परिसरातील शाळांमधील विद्यार्थीही उत्साहाने सहभागी झाले.कार्यक्रमाला महालगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच सुरेश आल्हाट, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पालक वर्ग व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी आनंदनगरीसाठी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडले होते, तर विज्ञान मेळाव्यात सर्जनशील प्रयोगांबरोबरच रांगोळी स्पर्धेत सहभाग घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक ढोबळे गुरुजी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच शेळके मामा, आखाडे मामा आणि वस्तीगृह अधीक्षक कल्पेश पवार गुरुजी यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाने गुरुकुलातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कौशल्याला वाव दिला व शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळाले.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चौकशीस विलंब

## ठेवीदार व कर्मचार्यांमध्ये नाराजी

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराच्या तक्रारीवर कार्यवाही न झाल्याने ठेवीदार आणि सेवानिवृत्त कर्मचारी नाराज आहेत. २०१६ पासून बँकेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोरडे यांच्या कारभाराची चौकशी सुरू आहे. मात्र, अद्याप समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकेस १६१ कोटींची मदत केली होती. मात्र, त्याचा ठेवीदार व कर्मचार्यांना लाभ झाला नाही. सेवानिवृत्त कर्मचार्यांना देय हक्कांचे पैसेही अद्याप मिळालेले नाहीत. नागपूर विभागीय आयुक्तांच्या निर्देशानुसार भंडारा येथील जिल्हा उपनिबंधकांच्या उपस्थितीत




सुनावणी घेण्यात आली. परंतु, प्रमुख मुद्यांवर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने शेतकरी व कर्मचार्यांमध्ये संताप आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोरडे यांना निलंबित करण्याची मागणीही प्रलंबित आहे. मात्र, बँकेला बाजू मांडण्यासाठी मुदत वाढ दिल्याने चौकशीत विलंब होत असल्याचे समोर आले आहे.

# अवकाळी पावसामुळे वैजापूर तालुक्यात गहू पिकाचे मोठे नुकसान

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यात २८ डिसेंबर रोजी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे गहू आणि इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



ढगाळ वातावरणामुळे याआधीच कांदा आणि हरभऱ्यासारख्या पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांना फवारणीसाठी मोठा खर्च करावा लागला होता. त्यातच अचानक झालेल्या पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी नुकसानीचे त्वरीत पंचनामे करून लवकरात लवकर मदत देण्याची मागणी सरकारकडे केली आहे. या नुकसानामुळे शेतकरी हतबल झाले असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

# नोकरीचे आमिष दाखवून दोन युवकांची लाखो रुपयांची फसवणूक

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यात नोकरीचे आमिष दाखवून दोन युवकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिऊर पोलीस ठाण्यात तिघा संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ऋषिकेश राजेंद्र ठोंबरे (वय २६, रा. भायगाव, ता. वैजापूर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्याकडून १५ लाख रुपये आणि इतर एका व्यक्तीकडून २८ लाख ५० हजार रुपये घेतले गेले. आरोपींनी खोटी कागदपत्रे तयार करून नोकरीचे आमिष दाखवले व दोघांची फसवणूक केली.कल्पेश रोहीकांत जाधव ,रामदास नारायण जाधव (दोघेही रा. धनेगाव, ता. देवणी, जि. लातूर)., प्रकाश गणपत जगताप (रा. राजघाट रोड, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर) असे आरोपींचे नावे आहेत.२६ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता शिऊर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास आर्थिक गुन्हा




शाखा करत आहे. या घटनेमुळे फसवणूक झालेल्या युवकांत संतापाचे वातावरण आहे.

# महात्मा फुले विद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

मोरवड येथील महात्मा जोतीराव फुले विद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी, शरीर सुदृढ राहावे आणि क्रीडा उपक्रमांद्वारे आनंद मिळावा, या उद्देशाने क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.कबड्डी, खो-खो, लांब उडी, उंच उडी, थाळीफेक, भालाफेक, क्रिकेट, लिंबू चमचा शर्यत, स्लो-सायकलिंग, संगीत खुर्ची अशा विविध खेळांचा या क्रीडा सप्ताहात समावेश होता. क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ मोहोळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रीडा शिक्षक बाळासाहेब बनगर यांच्यासह भाऊसाहेब हिंगणे, नवनाथ गायकवाड, गणेश गायकवाड, विक्रम अनारसे, सचिन मोहोळकर, अजिनाथ मोहोळकर, शिल्पा गवारी, राजेंद्र नाळे आणि हरिचंद्र जाधव हे मान्यवर उपस्थित होते.हा क्रीडा सप्ताह यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला व खेळांमधून आनंद मिळवला.क्रीडा सप्ताहाने विद्यार्थ्यांमध्ये सांघिकता, सुदृढता आणि क्रीडाप्रेम वाढवण्यास मोठे योगदान दिले.



# शहरातील मॉडेल पा.वा.नवीन मुलींची शाळा कचरा मुक्त होणार : डॉ.यशवंत लांजेवार

## स्वच्छता जनजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात धन कचरा व्यवस्थापनासाठी शासन स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. मात्र त्या कागदोपत्री राबविण्याचा झपाटा पाहावयास मिळत आहे. त्यात ओला कचरा, सुका कचरा याची सुद्धा वाट लावली जाते. खरंतर स्वच्छता मोहीम याकरिता प्रशासन कानाडोळा करत आहे. मात्र त्याकरिता लाखो रुपयांचा चुना शासनाला लावल्या जात आहे. हे वास्तविक स्थिती आहे. लहान वयापासूनच विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटावे याकरिता नंदगोपाल फाऊंडेशन ही सेवाभावी संस्था आहे. शहरातील टंडन वार्ड दत्त घेतले आहे. आणि त्या माध्यमातून या परिसरात येणाऱ्या पा. वा. नवीन मुलींची उच्च प्राथमिक शाळा ही शहरातील मॉडेल शाळा कचरा मुक्त होणार असे प्रतिपादन नंदगोपाल फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. यशवंत लांजेवार यांनी केले.

ते पा. वा. नवीन मुलींची उच्च प्राथमिक शाळा व नंदगोपाल फाऊंडेशन स्वयंसेवी संस्था भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता जनजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पा.वा. नवीन मुलींची उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता हुकरे(पटोले) होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून नंद गोपाल फाऊंडेशन स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक डॉ. यशवंत लांजेवार, प्रमुख पाहुणे म्हणून न्यू गर्ल स्कूलच्या सदस्या तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापिका करुणा इन्कने, पर्यावरण मित्र तथा सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर, नंदगोपाल फाऊंडेशनचे सरिन भोयर, भोजराज गौतम, रविशंकर साकोरे, हेमराज ठाकरे, मनोज लांजेवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. नंदगोपाल फाउंडेशन ही स्वयंसेवी संघटना असून त्यात शहरातील नामवंतासह अनेक कार्यकर्त्यांनी भंडारा शहर हिरवेगार करण्याचा संकल्प केला आहे. त्या माध्यमातून शहरात एक हजार ३१ विविध प्रजातींचे वृक्षारोपण करून संगोपनासाठी सरसावले आहेत. वृक्षारोपणाबरोबरच स्वच्छ भंडारा, सुंदर भंडारा करण्यासाठी शहरात जनजागृती करण्यात येत आहे. पा. वा. नविन मुलींची उच्च प्राथमिक शाळा दत्तक घेतली आहे. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या



ज्ञानात भर घालण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शाळेच्या सहकार्य नेहमी लाभणार असे मत न्यू गर्ल स्कूलच्या सदस्या तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापिका करुणा इन्कने यांनी केले.उपस्थित मान्यवरांनी शाळेतील विद्यार्थी -विद्यार्थिनींच्या बाल मनावर योग्य संस्कार रूजविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जाणार व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आदर्श नागरिक बनावे असे मार्गदर्शन पर्यावरण मित्र विलास केजरकर यांनी केले. तसेच विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच स्वच्छतेची धडे गिरविण्यासाठी पुढाकार घ्यावा असे मार्गदर्शन पा.वा. नवीन मुलींची उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता हुकरे (पटोले) यांनी केले.त्यावेळी कोण बनेगा स्वच्छता रक्षक यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ओवी राऊत, शेजल नंदनवार, श्रीया पंचबुध्दे, गुंजन सव्वालाखे, सातवी हुकरे, विकल शहारे, भाग्या कोल्हे, गोवी पडोळे, चारू बिसने, हीमांनी नवघरे, पूर्वी मदनकर, निशित मडावी, निशित मडावी, प्रियल मदनकर सह अनेक विद्यार्थीनींनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक प्रेमलाल मलेवार व प्रास्ताविक कु. राणु करनाहके यांनी केले तर उपस्थितांचे आभार अंशु राऊत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता वनिता खोकले, राणी रहांगडाले, योगिता काटेखाये, रंजित खंगार, मनीषा वंजारी, जागेश्वर भुरे, सरिता जाऊळकर, शारदा सूर्यवंशी, रत्ना बागडे, विलास खोब्रागडे, अश्विनी चांदेवार, मेघा खवास, मोहिनी पाथोडे, शुभांगी श्रावणकर, शारदा सेलोकर तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

# टीव्ही ९ चे शितलकुमार मोटे यांना ‘राज्यस्तरीय क्रांतिसूर्य पुरस्कार’

**सोलापूर । प्रतिनिधी**

टीव्ही ९ वृत्तवाहिनीचे करमाळा, भूम-परांडा प्रतिनिधी शितलकुमार मोटे यांना जगदीशब्द फाउंडेशनतर्फे 'राज्यस्तरीय क्रांतिसूर्य पुरस्कार' प्रदान केला जाणार आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरल्याचे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जगदीश ओहोळ यांनी सांगितले.



पाथुर्डी या ग्रामीण भागातून आलेल्या शितलकुमार मोटे यांनी पत्रकारितेत भरीव कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्यातून इतरांना प्रेरणा मिळत असल्याने हा सन्मान त्यांना जाहीर करण्यात आला आहे, असे ओहोळ यांनी स्पष्ट केले. हा पुरस्कार रविवार, ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील गंजपेठ येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी करमाळा तालुक्यातील साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ओहोळ यांनी केले आहे.

# दिवंगत माजी पंतप्रधान स्व.मनमोहन सिंग यांना गांधी चौक मित्र परिवाराची श्रद्धांजली

**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

गांधी चौक मित्र परिवारातर्फे देशाचे माजी पंतप्रधान आणि ख्यातनाम अर्थतज्ज्ञ दिवंगत स्व. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या श्रद्धांजली सभेत गांधी चौक मित्र परिवाराचे अध्यक्ष गजानन खंडाळे, माजी नगराध्यक्ष आणि शहर काँग्रेस अध्यक्ष प्रकाशचंद्र डफ, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष गंगाधरराव कालोडे, किशोर सोनटक्के, खाविसचे उपसभापती ए.सी. कालोडे, युवक काँग्रेस अध्यक्ष अफजल बेरा, रवी राणा, सुधीर झिलपे, तेजस सोनटक्के, प्रशांत (गोटू) ढोबळे आदी मान्यवरांनी सहभागी होऊन दिवंगत नेत्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली. कार्यक्रमादरम्यान स्व. मनमोहन सिंग यांचे देशासाठीचे योगदान आणि त्यांच्या नेतृत्वाचा गौरव करत उपस्थितांनी त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना केली.



# संजय बोरकर यांना व्हीलचेअर भेट सरपंच गीता बोरकर यांचा स्तुत्य उपक्रम

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

गिरगाव येथील रहिवासी आणि झाडिपट्टी रंगभूमीवरील प्रसिद्ध नाट्यकलावंत संजय वासुदेव बोरकर हे अनेक वर्षांपासून गंभीर आजाराने त्रस्त आहेत. आजारपणामुळे त्यांना आता चालणे फिरणेही शक्य नाही. दिव्यांगत्वामुळे नाट्यकलावंत म्हणूनही ते काम करू शकत नाहीत, तसेच त्यांना सरकारी योजनांचा लाभही मिळालेला नाही. सामाजिक भान ठेवत गिरगावच्या लोकनियुक्त सरपंच गीता अशोक बोरकर यांनी संजय बोरकर यांची भेट घेतली. त्यांच्या व्यथा जाणून घेतल्यानंतर सरपंच बोरकर यांनी त्यांना व्हीलचेअर भेट दिली. त्याचबरोबर, शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.या




उपक्रमाच्या वेळी भाजपा जिल्हा परिषद वाढोणा सर्कल प्रमुख रमेश पांडुरंग बोरकर, पंचायत समिती सर्कल प्रमुख भोजराज लांजेवार, गिरगाव भाजपा अध्यक्ष भुषण दयानंद बोरकर, बूथ प्रमुख ईश्वर गहाणे, युवा शक्ती कार्यकर्ते नेताजी थेरकर, जितेंद्र बोरकर, प्रतिभा बोरकर आणि विजुताई बोरकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.सरपंच गीता अशोक बोरकर यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. संजय बोरकर यांच्या मदतीसाठी केलेला हा प्रयत्न सामाजिक बांधिलकीचा उत्कृष्ट नमुना ठरला आहे.

# झाडीबोली साहित्य संमेलनात काय म्हणतील लोक कवितासंग्रहाचे प्रकाशन संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

झाडीबोली साहित्य मंडळ साकोलीच्या वतीने व शाखा वरोरा यांच्या रोप्य महोत्सवी पर्वानिमित्त २८ डिसेंबर रोजी श्रद्धे बाबा आमटे साहित्य नगरी, वरोरा येथे झाडीबोली साहित्य संमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक लोकराम शेंडे होते, तर उद्घाटन खासदार प्रतिभा धानोरकर (चंद्रपूर-आर्णी लोकसभा क्षेत्र) यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक विकासभाऊ आमटे उपस्थित होते. यावेळी नीरज आत्राम लिखित काय म्हणतील लोक या कवितासंग्रहाचे प्रकाशन डॉ. हरिश्चंद्रजी बोरकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



कार्यक्रमात प्रबोधनकार इंजि. भाऊ थुटे, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, डॉ. हेमकृष्ण कापगते, ॲड. लखनसिंह कटरे, हिरामण लांजे, राजन जयस्वाल आणि आचार्य ना. गो. थुटे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.कवितासंग्रहाला अशोक कुबडे 'गोंडर' यांची प्रस्तावना लाभली आहे. तसेच प्रांजली काळबेंडे (मुंबई), आनंद घोडके (सोलापूर), आणि डॉ. श्याम मोहरकर (चंद्रपूर) यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.कार्यक्रमाला विविध साहित्यिक, कवी-कवयित्री, कलाकार आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी नीरज आत्राम यांच्या साहित्यिक कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या संमेलनाने झाडीबोलीतील साहित्यातील विविध पैलूंवर चर्चा घडवून आणली. नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिकांनी आपल्या रचना सादर करत साहित्यातील झाडीबोलीचा महत्त्वाचा ठेवा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

# कुरकुंभ एमआयडीसी येथील अल्काईल अमाईन्स कंपनीत भीषण स्फोट;एक गंभीर जखमी




**शिरूर । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील पुणे-सोलापूर महामार्गालगत असलेल्या कुरकुंभ एमआयडीसी क्षेत्रातील अल्काईल अमाईन्स केमिकल्स लिमिटेड कंपनीत २८ डिसेंबरला पहाटे भयंकर स्फोट झाला. या स्फोटात सागर प्रल्हाद रणभावरे (वय २३, रा. नेवासा, जि. अहिल्यानगर) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी पुण्यातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, डिस्टलेशन रेसिडेंट प्रेशर जास्त झाल्याने टँक फुटल्यामुळे हा स्फोट झाला असावा, असे सांगण्यात आले आहे. स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कंपनीतील उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.घटनास्थळी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक अखिल घोगरे, सुरक्षा अधिकारी अंकुश खराडे, दौंड पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, सहायक पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी त्वरित भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. सध्या या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.या भीषण घटनेने कुरकुंभ एमआयडीसी परिसरातील कामगारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, औद्योगिक सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# शेतकऱ्याने केला धुमधडाक्यात नंदु बैलाचा वाढदिवस

**उमरखेड । प्रतिनिधी**

घरातील थोरामोठ्यांचे वाढदिवस साजरे करणे सर्वांसाठी सामान्य असले तरी, उमरखेड येथील शेतकऱ्यांनी आपल्या घरात जन्मलेल्या नंदु बैलाचा तिसरा वाढदिवस एका वेगळ्या धुमधडाक्यात साजरा केला. बैलाच्या वाढदिवसाची तयारी बॅनर, आतिषबाजी आणि डीजे वाद्यांच्या गजरात करण्यात आली. केक कापण्याच्या सोहळ्यात, नंदूला साजेशी सजवून त्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

शेतकरी बंधू बालाजी भगवान गायकवाड व संजय भगवान गायकवाड यांनी आपल्या प्रिय बैलाचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. त्यांनी शेतकऱ्यांची कामगिरी आणि प्रेम दर्शविणारा हा अनोखा सोहळा आयोजित केला. त्याला छत्रपती शिवाजी महाराज व महादेवाची विधीवत पूजा करण्यात आली आणि नंदूला तिलक लावण्यात आला. डीजेच्या गजरात



नंदूनेही उपस्थितांसोबत नाचण्याचा ठेका धरला, आणि हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. नंदूचा वाढदिवस २६ डिसेंबरला असताना, गायकवाड बंधूंनी २५ डिसेंबरला शहरभर बॅनर लावून या उत्सवाची दखल घेतली, आणि त्याचा उत्सव चर्चेचा विषय बनला. सहकार्य केलेले लोक: गंगाराम कवाने, अमोल तीवरंगकर, अमोल बाभुळकर, बंडू वटाणे, बालाजी कवाने, अमोल वटाणे, अमोल गायकवाड.

> **“नंदूचा जन्म झाल्यापासून आमच्या शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्याच्या पायगुणाने आमची प्रगती झाली, त्यामुळे त्याला घराच्या सदस्याप्रमाणेच वागणूक देतो. २१ डिसेंबरला आमचा मुलगा अमोल याचा वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा केला, परंतु नंदूचा तिसरा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा करण्याचा निर्णय घेतल्याने आजचा सोहळा खास बनला. -बालाजी भगवान गायकवाड,उमरखेड.**

# जुन्या भांडणाच्या कारणांमुळे कोयता व तलवारीने वार केल्याप्रकरणी पांच जणांवर गुन्हा दाखल

**सातारा । प्रतिनिधी**

२६ डिसेंबर रोजी जुन्या भांडणाच्या कारणांमुळे डबे वाडी, तालुका सातारा येथे करणं जोतिराम चव्हाण याच्यावर कोयता आणि तलवारीने वार केल्याचा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना रात्री साडे सात ते साडेआठ वाजता घडली.

दादा पवार, साहील रणदिवे, परशा डायमंड, रोशन आणि एक अनोळखी व्यक्ती यांनी करणं यावर कोयता आणि तलवारीने हल्ला केला. यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस याबाबत पुढील तपास करीत आहेत.



## राहुल रसाळ आणि कपिल जाचक ही ज्ञानाची विद्यापीठे

# कमलाई कृषी प्रदर्शन २०२४ चे उद्घाटन प्रसंगी डॉ.अविनाश पोळ यांचे करमाळा येथे प्रतिपादन

**सोलापूर । प्रतिनिधी**

१५ ते २० देशांतून भ्रमंती करून ज्ञानसंग्रह करणारे राहुल रसाळ आणि गेल्या ५० वर्षापासून केळी क्षेत्रामध्ये काम करणारे जाचक कुटुंबीय ही ज्ञानाचे विद्यापीठे असून करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी हेच ज्ञानाचे दालन खुले करण्यासाठी आज राहुल रसाळ आणि कपिल चाचक यांना कमलाई कृषी प्रदर्शन मध्ये निमंत्रित केले असल्याचे प्रतिपादन पाणी फाउंडेशन चे मार्गदर्शक डॉ.अविनाश पोळ यांनी उद्धघाटनप्रसंगी केले.यावेळी व्यासपीठावर कळस कृषी प्रदर्शनाचे प्रमुख वैभव वाकचौरे, कपिल चाचक, राहुल रसाळ, तहसीलदार शिल्पा ठोकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पाणी फाउंडेशन चे रवींद्र खोमणे, विभागीय समन्वयक संतोष शिंनगारे, सुखदेव भोसले, विक्रम फाटक,उमेद चे योगेश जगताप,प्रा.लक्ष्मण राख आदी उपस्थित होते.




यावेळी बोलताना कपिल जाचक म्हणाले की, जळगाव पाठोपाठ करमाळा तालुका हा आता केळीचा समुद्र बनला आहे नव्हे तर तो एक्सपोर्ट चा समुद्र बनलेला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी अधिकाधिक केळी एक्सपोर्ट होण्याच्या दृष्टीने लागवडीचे नियोजन केले पाहिजे. पारंपरिक पद्धतीने केळी लागवड न करता ती जोड ओळ या पद्धतीने केली पाहिजे त्याचा फायदा सूर्यप्रकाश मिळण्यासाठी होतोच त्याचबरोबर अंतर मशागत करणेही सोपे जाते.केळी हे पीक सूर्यप्रकाशाचे भुकेलेले असते त्यामुळे लागवड ही नेहमी उत्तर दक्षिण याच पद्धतीने केली पाहिजे.केळीच्या शेतामध्ये कसलाही काडी कचरा न ठेवता तो बाहेर काढून आपण त्याचे खत तयार केले पाहिजे. या साध्या साध्या गोष्टींचे आपण पालन करत गेलो तर केळी निर्यात करणे अजिबात अशक्य नाही. त्याचबरोबर केळीसाठी जे अन्नघटक आवश्यक आहे त्याची मात्रा नियमितपणे ड्रेंचिंग च्या माध्यमातून गेली पाहिजे. वेगवेगळ्या कंपन्यांचे फसवे खते आणि औषधे वापरून कर्जाचा बोजा वाढवण्यापेक्षा शेतकऱ्यांनी वेळ आणि काळ पाहून त्या त्या वेळेला आवश्यक ती पाणी आणि खतांची मात्रा दिली पाहिजे असे केल्यास शेतकऱ्यांचा एकरी उत्पादन खर्चही कमी होईल आणि केळी निर्यात करणे ही सहज शक्य होईल.अवाच्या सव्वा केळीच्या घडाची लांबी वाढवली आणि साईज वाढवली म्हणजे तो मला एक्स्पोर्ट होतो हा गैरसमज आहे. एकरी जास्तीत जास्त ४० टनापर्यंत उतार एक्सपोर्ट साठी चालतो व केळीच्या घडाचे वजन २७ ते ३० किलो या दरम्यान असले पाहिजे.केळीच्या घडाला जास्तीत जास्त ९ फण्या आल्या पाहिजेत किंवा आपण त्या राखल्या पाहिजेत. एवढं मजबूत नियोजन केल्यास केळी निर्यातीत करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांचा हात आजच्या घडीला तरी कोणीच धरू शकणार नाही असा ठाम आशावाद त्यांनी व्यक्त केला. डाळिंब या फळ पिकाविषयी मार्गदर्शन करताना राहुल रसाळ म्हणाले की गेले २० वर्षापासून डाळिंब या पिकांची लागवड आम्ही सातत्याने करत आहोत. हे करत असताना यामध्ये आतापर्यंत कधीही फेल गेलेलो नाही,याचे प्रमुख कारण म्हणजे या पिकाला खत आणि पाणी देण्याच्या वेळा व फवारणी करण्याची वेळही आम्ही काटेकोरपणे पळत आलेलो आहोत. फवारणीसाठी जे पाणी आपण वापरतो त्यामध्ये क्षार नसले पाहिजेत जर त्या पाण्यामध्ये अधिक क्षार असतील तर औषधाची मात्रा लागू होत नाही. फवारणी करत असताना तापमान ४० पेक्षा अधिक असेल तर आपल्या फवारणीतील ५०% खत हे बाष्पीभवन द्वारे उडून जाते. त्यामुळे फवारणीची ही वेळ आपण योग्य निवडली पाहिजे.शेतकऱ्यांकडे आधुनिक काळात शेती करत असताना हायड्रोमीटर ,टीडीएस मीटर हे मीटर असलेच पाहिजेत कारण आपण पिकांसाठी जी महागडी खते आणि औषधे वापरत असतो त्यातील ५०% वायाला जाणारा खर्च हे दोन मीटर वाचवू शकतात. उद्धाटन पर मार्गदर्शन करताना कळस कृषी प्रदर्शनाचे प्रमुख वैभव वाकचौरे म्हणाले की पहिल्याच वर्षी कमलाई कृषी प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद शेतकऱ्यांनी दिलेला आहे. त्यामुळे पुढील वर्षी प्रात्यक्षिकयुक्त कृषी प्रदर्शन भरवावे त्यामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानामध्ये अधिकची भर पडेल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोलापूर जिल्हा विभागीय समन्वयक सत्यवान देशमुख यांनी केले तर आभार कुंभारगाव ॲग्रो चे महेंद्र देशमुख यांनी मानले. सूत्रसंचालन प्राध्यापक सुजाता भोर यांनी केले.

### चेंज मेकर पुरस्कार देऊन तालुक्यातील १० महिला गटांचा व विक्रीम उत्पन्न घेणाऱ्या २ शेतकऱ्यांचा झाला सन्मान

१.महालक्ष्मी महिला शेतकरी गट साडे
२.अन्नपूर्णा महिला शेतकरी गट पोटेगाव
३.संघर्ष महिला शेतकरी गट कोर्टी
४.जिजाऊ महिला शेतकरी गट फिसरे
५. जिजाऊंच्या लेकी महिला शेतकरी गट सरपडोह
६. मदार महिला शेतकरी गट घोटी
७.कुटुंब महिला शेतकरी गट कुंभारगाव
८. क्रांती ज्योती महिला शेतकरी गट शेलगाव (क)
९. राजमाता महिला शेतकरी गट वीट
१०.कृषी क्रांती महिला शेतकरी गट हिसरे


### वैयक्तिक पुरस्कार

१.राहुल राऊत (कुंभारगाव) एकरी तुर १८.२० क्विंटल
२. अक्षय शेंडे ( घोटी) एकरी मका ४५ क्विंटल

# खळी, चिंचटाकळी, गौडगाव, मैराळ सावंगी रस्त्याचे काम पूर्णत्वास न्यावे

**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेड तालुक्यातील खळी, चिंचटाकळी, गौडगाव, मैराळसावंगी या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २०२२ पासून सुरू केले आहे, परंतु या रस्त्याचे काम अजून पूर्ण झालेले नाही. स्थानिक ग्रामस्थ आणि वाहनधारकांच्या सुरक्षिततेसाठी या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.



मागील दोन वर्षांपासून या रस्त्याच्या दुतर्फा नाल्यांचे काम सुरू असताना ते पूर्ण झाले नाहीत. त्याऐवजी, त्या नाल्यांमध्ये माती बुजोली असून चिलारी (काटेरी झुडपे) वाढलेली आहेत, ज्यामुळे वाहनधारकांना प्रवास करताना अडचणी येत आहेत. त्यातूनच अनेक अपघात घडलेले आहेत. सदर कामासाठी संबंधित विभागाकडून वाढीव बिल आणि रक्कम मिळाल्याची माहिती आहे. तरीही रस्ता अजून पूर्ण झालेला नाही. स्थानिक ग्रामस्थांची आणि पंचक्रोशीतील नागरिकांची एकमुखी मागणी आहे की खळी, चिंचटाकळी, गौडगाव, आणि मैराळसावंगी या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, जेणेकरून तेथील नागरिकांचा प्रवास सुरक्षित होईल आणि अपघातांची संख्या कमी होईल.

# पत्रकार सुरक्षा समिती पश्चिम महाराष्ट्र संघटक पदी मिर्झागालिब मुजावर यांची नियुक्ती

**माळशिरस (प्रतिनिधी)**

पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने पत्रकारांच्या हक्कासाठी गेली आठ वर्षे विविध आंदोलने आणि उपोषणांद्वारे कार्यरत असलेल्या मिर्झागालिब मुजावर यांची पश्चिम महाराष्ट्र संघटक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पत्रकार सुरक्षा समितीने राज्यातील पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी तीव्र आंदोलने, निवेदनं आणि पत्रव्यवहार केला आहे. या संघटनेचे मुख्य मुद्दे राज्यातील पत्रकारांसाठी समान पेन्शन योजना, पत्रकार संरक्षण कायदा, सरकारी मान्यता प्राप्त यूट्यूब व पोर्टलसाठी जाहिराती, आरोग्य व विमा योजना, घरकुल योजना तसेच टोलमधून सूट यांसारख्या अनेक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले आहे.



मिर्झागालिब मुजावर हे सांगोला तालुक्यातील असून, दैनिक तुफान क्रांती चे संपादक आहेत. पत्रकारितेतील दांडगा अनुभव असलेल्या मुजावर यांनी वंचित घटकांसाठी आणि सामान्य माणसांच्या हक्कांसाठी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून आवाज उठवला आहे. दैनिक तुफान क्रांती ने जनसामान्यांच्या प्रश्नांवर चांगला दबदबा निर्माण केला आहे. राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात या वृत्तपत्राने वेगळा ठसा उमठवला आहे. पत्रकार सुरक्षा समितीच्या नूतन पदाधिकारी २०२५ साठी मिर्झागालिब मुजावर यांची पश्चिम महाराष्ट्र संघटक पदी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांचे प्रदेशाध्यक्ष यशवंत पवार, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रामचंद्र सरवदे, प्रदेश सचिव डॉ. आशिषकुमार सुना, मराठवाडा विभाग अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, सोलापूर जिल्हा अध्यक्ष संतोष म्हेत्रे, जिल्हा कार्याध्यक्ष सादिक शेख आणि इतर अनेक मान्यवरांनी अभिनंदन आणि शुभेच्छा दिल्या आहेत.

# आगळावेगळ्या पाहुण्यांसोबत आगळावेगळा विवाह



**पुलगाव । प्रतिनिधी**

विवाह सोहळा आयुष्यातील एक अत्यंत खास आणि सुखद क्षण असतो. ह्या सोहळ्याची तयारी प्रपंचाच्या प्रत्येक स्तरावर केली जाते. काळानुसार, विवाह सोहळ्याचे आयोजन विविध ठिकाणी होत असते – कापडी मंडपापासून ते डेस्टिनेशन वेडिंग, रिसॉर्ट्स आणि कधी कधी जहाजांवर किंवा विमानांमध्ये. अशाच एका आगळ्या वेगळ्या विवाह सोहळ्याचे आयोजन पुलगाव परिसरातील मीरा कॉलनी येथील रविकिरण मनोहर भोजने आणि वायसीसी अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक रविकिरण नागपुरे यांच्या मुलामुलीच्या विवाहासाठी करण्यात आले.

मंजिरी हिचे शैक्षणिक शिक्षण व्ही एन आय टी नागपूर आणि आयआयएम बेंगलोर यांसारख्या नामांकित संस्थांतून झाले आहे. अभिरागनेही शासकीय अभियांत्रिक महाविद्यालय अमरावती आणि अमेरिकेतून उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. दोघेही आपापल्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे आर्थिक दृष्ट्या समृद्ध आहेत.

मंजिरीला सामाजिक बांधिलकी जोपासणे खूप आवडते. आपल्या वाढदिवस साजरे करत असताना, तिने वृद्धाश्रम आणि अनाथालयांना मदत केली आहे. विशेषतः आसमंत स्नेहालय वर्धा (सेवाश्रम) या अनाथ आश्रमाशी तिचा जिव्हाळा आहे. मंजिरीने विवाह सोहळा या मुलांच्या उपस्थितीत होईल अशी इच्छा व्यक्त केली आणि तिच्या या इच्छेला दोन्ही परिवारांनी संमती दिली.

या अनोख्या विवाह सोहळ्याचे आयोजन मातोश्री वृद्धाश्रमात करण्यात आले, ज्यामध्ये त्या मुलांना उबदार कपडे देण्यात आले. विवाह सोहळ्यातील प्रमुख पाहुणे म्हणून आश्रमातील मुले-मुली उपस्थित होते. त्यांना विशेष पद्धतीने सजवून, चांदीच्या ताटांत जेवण देण्यात आले. विवाह सोहळ्याच्या वेळी त्यांना खास बसण्याची व्यवस्था केली गेली होती. मंजिरीने तिच्या विवाह सोहळ्याद्वारे सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठेवला. ह्या कार्यामुळे तिने आपल्या परिवारांसोबत एक आगळा विवाह सोहळा साजरा केला आणि समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले. भविष्यात आणखी असे अनेक परिवार अनाथालयातील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी समोर येतील, अशी आशा आहे.

# श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल मतदारा प्रति कृतज्ञता सोहळा

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी, विधानसभा सदस्य हेमंत यांनी मतदारांचा आभार मानताना सांगितले, माझ्या जीवाभावाच्या लोकांनी मला निवडून देऊन त्यांच्या प्रतिनिधित्वाची संधी दिली आहे. आज त्यांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी कायम मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असेन.



कार्यक्रमात श्रीरामपूर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष करणदादा ससाणे, शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त सचिन गुजर, अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब दिघे, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सुधीर नवले, अंजुमभाई शेख, शिवसेना उबाठा पक्षाचे शहरप्रमुख संजय छल्लारे, श्रीनिवास बिहाणी, माजी नगरसेवक आशिष धनवटे तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हे कृतज्ञता सोहळा सर्व उपस्थितांचे मनापासून आभार व्यक्त करण्याच्या एक अनोख्या पर्वाची सुरुवात होती, ज्यात श्रीरामपूर-राहुरी मतदारसंघाच्या विकासासाठी त्यांचे योगदान आणि आशा व्यक्त करण्यात आल्या.

# अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचून पिकांची नासाडी

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचून रब्बी हंगामातील पिकांची मोठी नासाडी होण्याची शक्यता आहे. यावर्षी हिवाळ्यात पावसामुळे बळीराजावर मोठे संकट ओढवले आहे. शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात कांदा, गहू, हरभरा, ज्वारी, मका आदी पिकांची पेरणी केली होती. पिकांच्या पेरणीपासूनच सतत ढगाळ हवामान आणि अचानक होणारा अवकाळी पाऊस यामुळे पिकांवर विविध प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे.



सततच्या ढगाळ वातावरणामुळे मावा, तुडतुडे, फुलकिडे यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. शेतकऱ्यांना आपल्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी महागडे कीटकनाशक वापरावे लागले आहेत. मात्र, डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचून पिकांच्या मुळ्यांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचे फळ हिरावून घेतल्यास उत्पादन खर्चही वसूल होऊ शकणार नाही. खाजगी सावकार, सोसायटी, बँक किंवा उसनवारीवर घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करायची, हा शेतकऱ्यांसाठी मोठा प्रश्न बनला आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाची भरपाई मिळवण्यासाठी शासनाने अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देऊन थोडासा हातभार लावावा, तसेच पिक विमा रक्कम शेतकऱ्यांना मिळवून देणे आवश्यक आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# श्रीरामपूर तालुक्यातील प्रवरा नदी पात्रामधील शेकडो मासे मृत्युमुखी; मृत माशांमुळे परिसरात मोठी दुर्गंधी

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर तालुक्यातील मांडवे-गंगापूर येथील प्रवरा नदीपात्रात कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याजवळ शेकडो मासे मृत्युमुखी पडले आहेत. यामुळे परिसरात मोठी दुर्गंधी पसरली असून, ही मृत माशांची घटना दुसरी आहे. पर्यावरणप्रेमी यावर तीव्र संताप व्यक्त करत आहेत. प्रवरा नदीतील मासे मृत्युमुखी पडण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

मृत मासे नदीपात्रात तरंगताना आढळले असून, त्यांची दुर्गंधी नदीकाठावरील दोन्ही गावांत पसरली आहे. कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यामुळे पाणी अडवले गेले असून, पाणी मांडवे-गंगापूर पुलापर्यंत साठवले गेले आहे. बंधाऱ्यातील जलपर्णी आणि मृत मासे कुजले असल्याचे दिसून येत आहे, आणि तीन दिवसांपासून मृत माशांचा थर साठल्यामुळे दुर्गंधी वाढली आहे.यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. उलट्या आणि मळमळीच्या त्रासाच्या तक्रारी सुरु झाल्या आहेत. कोल्हार आणि इतर परिसरातून ड्रेनेजचे पाणी तसेच केमिकलसयुक्त पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याचा दावा नागरिकांमध्ये करण्यात येत आहे, ज्याचा परिणाम जलचरांवर होण्याची शक्यता आहे.प्रदूषण नियंत्रण मंडळाने या घटनेची त्वरित दखल घेत पाण्याचे नमुने तपासून याचे कारण शोधावे, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. याशिवाय, मासेमारी करणाऱ्या लोकांनी मृत मासे बाजारात विक्रीसाठी नेल्याची चर्चा असून, त्यामुळे मासे खाणाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. बंधाऱ्यातील पाणी तेलकट तवंगाने भरले असून, पाणी काळेभोर झाले आहे, ज्यामुळे प्रदूषणाची स्थिती गंभीर झाली आहे.



# वसुंधरा फाऊंडेशन तर्फे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन;प्रत्येक रक्तदात्यास दोन आकर्षक भेटवस्तू

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथे वसुंधरा फाऊंडेशन तर्फे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. याचबरोबर, मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी तसेच स्त्रीरोग आणि व्यंधत्व निवारण शिबिराचे देखील आयोजन केले आहे.वसुंधरा फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे, आणि यावर्षी २९ डिसेंबर रोजी रविवार सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत महर्षी दधीची ऋषी समाधी मंदिर येथे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.

रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास सरपंच जयश्रीताई विश्वासराव गुंजाळ व उद्योजक विश्वासराव गुंजाळ यांच्या हस्ते जेवणाचा डबा आणि पाणी बॉटल भेट म्हणून दिले जाणार आहे. याशिवाय, सर्व रक्तदात्यांसाठी लकी ड्रॉ चे आयोजन केले आहे. यामध्ये प्रथम क्रमांकासाठी धर्मचंद भवरीलाल सराफ अँड ज्वेलर्स घोडनदी कडून स्पोर्ट सायकल, द्वितीय क्रमांकासाठी योगेश बाळासाहेब कोरके यांच्याकडून विद्युत पंप आणि तृतीय क्रमांकासाठी शांताराम गुंजाळ यांच्याकडून फवारणी पंप भेट स्वरूपात देण्यात येणार आहे.

तसेच, जोडीने रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास पैठणी साडीची भेट पोलीस सागर बनकर व सुधीर ढवळे वेदांत कॉम्प्युटर यांच्या माध्यमातून दिली जाणार आहे.

महिला रक्तदात्यांसाठी देखील भव्य लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रथम क्रमांकासाठी उपसरपंच सचिन बाळासाहेब लोखंडे यांच्या कडून मिक्सर, द्वितीय क्रमांकासाठी अनिल नामदेव बनकर यांच्या कडून मल्टी कढई सेट आणि तृतीय क्रमांकासाठी ग्रा. सदस्य तुषार बाळासाहेब वाघमारे यांच्या कडून नॉन स्टिक पॅन सेट भेट दिले जाणार आहेत.कार्यक्रमाच्या वेळी सर्वांसाठी भोजनाचे आयोजन केले आहे. वसुंधरा फाऊंडेशनने जास्तीत जास्त रक्तदात्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून समाजाच्या भल्यासाठी रक्तदानाची भावना वाढवता येईल.

# केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी घेतले शनिदर्शन

**राहुरी । प्रतिनिधी**

केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सपत्नीक शुक्रवार २७ डिसेंबर रोजी शनिशिंगणापूर येथे येऊन शनिमुर्तीचे दर्शन घेत शनी अभिषेक केला. केंद्रीय मंत्री गोयल यांनी सपत्नीक उदासी महाराज मठात विधिवत शनी अभिषेक करुन शनी चौथऱ्यावर जाऊन तेल अर्पण केले. शनी मंदिरात गर्दी असल्याने प्रशासनाने भाविकांचे दर्शन बंद केले होते परंतु मंत्री गोयल यांनी आलेल्या भाविकांचे दर्शन बंद न करता दर्शन व्यवस्था सुरळीत चालू ठेवण्याची सुचना केली.



शनिशिंगणापूर देवस्थानच्या वतीने कोषाध्यक्ष दीपक दरंदले, प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय बिराजदार, योगेश बानकर आदींनी स्वागत केले. जनसंपर्क कार्यालयात अधिकाऱ्यांकडुन परिसराची माहिती जाणून घेत कृषी, वाणिज्य याबाबत चर्चा केली. देवस्थान राबवत असलेली परीसरातील विकासकामे व नव्याने तयार झालेला चौथरा पानसतिर्थ प्रकल्प पाहून समाधान व्यक्त केले. देवस्थानच्या वतीने मंत्री गोयल यांचा सन्मान करण्यात आला.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यामधील अरणगाव गावाच्या हद्दीत

## राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या भरारी पथकाची कारवाई

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यामधील अरणगाव गावाच्या हद्दीत श्रीगोंदा जामखेड मार्गावरील एच. पी. पेट्रोल पंपाजवळ महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ चारचाकी वाहनामधील गोवा बनावटीचे मद्य मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर वाहनामध्ये भरत असताना छापा मारुन गोवा बनावटीच्या ॲडीरियल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या एकूण ३२४ सिलबंद बाटल्यांचे २७ बॉक्स, दोन वाहनासह अंदाजे रक्कम १६ लाख ७२ हजार ७२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.



या गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील तपासामध्ये धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात लोणारवाडी परिसरात भैरवनाथ मंदिराजवळ अशोक लेलॅण्ड कंपनीचा दोस्त चारचाकी वाहन व मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर या वाहनाससह व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या २१६ सिलबंद बाटल्यांचे १८ बॉक्स असा अंदाजे रक्कम १४ लाख ५० हजार ४८० रुपये किंमतीचा मुद्देमाल रिकव्हरी पंचनाम्याखाली जप्त करुन दोन व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.

या प्रकरणी अहिल्यानगर जिल्ह्यातील दीपक आत्माराम खेडकर, भरत शहाजी राळेभात, मनोज दत्तात्रय रायपल्ली, दत्तात्रय गंगाधर सोनवणे, धाराशिव जिल्ह्यातील शस्त्रगुण ऊर्फ शतृन नवनाथ किर्दक व कैलास आण्णा जोगदंड यांच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलमाअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

ही कारवाई निरीक्षक नरेंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक विराज माने व धीरज सस्ते, प्रताप कदम, सतिश पौंधे, शशिकांत भाट, रणजीत चव्हाण, अनिल थोरात, अमोल दळवी, राहुल तारळकर यांनी केली. अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यावर अशाच प्रकारची कारवाई सुरू राहणार असून कोठेही अवैध दारू व्यवसाय सुरू असल्यास राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाचा संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.

# उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देणारी क्षमता विकास कार्यशाळा आयोजित



**वर्धा । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (चडचए) मंत्रालयाच्या रॅम प्रकल्पांतर्गत जिल्हा प्रशासन आणि विविध संस्थांच्या सहकार्याने उद्योजकांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. आयआयएम नागपूर इन्फेड, लघु उद्योग भारती वर्धा आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्पेडवूडचे सह-संस्थापक विवेक देशपांडे, कॉर्पोरेट वकील डॉ. शंतनु जोग, आणि आयआयएमचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. निलकंठ ढोणे यांनी उपस्थितांना उद्योग क्षेत्रातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. देशपांडे यांनी सुक्ष्म व कार्यक्षम व्यवस्थापनाच्या पद्धती स्पष्ट केल्या, डॉ. जोग यांनी बौद्धिक मालमत्तेचे महत्त्व उलगडले, तर डॉ. ढोणे यांनी उद्योग व्यवस्थापनासाठी प्रभावी तंत्र आणि उदाहरणे सादर केली.कार्यक्रमात लघु उद्योग भारतीचे महाराष्ट्र सहसचिव हरीष हांडे, जिल्हा उद्योग केंद्राचे तुषार आठवले, वर्ध्याचे अध्यक्ष जगदीश पटेल, जिल्हा इंडस्ट्रियलिस्ट असोसिएशनचे प्रविण हिवरे यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी इन्फेडचे अमोघ तिजारे व आयबीएफसी वर्धाचे समन्वयक रुपेश रामगडे यांनी विशेष योगदान दिले.जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

# मनमोहनसिंग यांनी शेतकरी कर्जमाफीचे संकेत प्रवरानगरला दिले होते



**शिर्डी । प्रतिनिधी**

प्रवरानगर येथे अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी मनमोहनसिंग आले होते. या समारंभाला तत्कालीन राज्यपाल एस. एम. कृष्णा, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, खासदार बाळासाहेब विखे पाटील उपस्थित होते.याच समारंभात त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी योजनेचे सूतोवाच केले होते.

देश के सबसे मेहनती और आधुनिक किसान' अशा शब्दांत त्यांनी त्यावेळी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा गौरव केला होता. संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देत आहे. सरकारने साखर कारखान्यांसाठी विशेष पॅकेज दिले आहे. त्याचबरोबर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी चालू पंचवार्षिक योजनेत तब्बल ३५ हजार कोटींच्या दोन योजना सुरु केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जाची मोठी समस्या असून त्यावर लवकरच तोडगा काढला जाईल असे ते म्हणाले होते. विठ्ठलराव विखे पाटील हे 'कर्मयोगी' आहेत असे त्यांनी विखे पाटलांबाबत गौरवोद्गारही काढले होते.

२९ फेब्रुवारी २००८ रोजी मनमोहनसिंग सरकारचा अर्थसंकल्प मांडताना तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी शेतकऱ्यांसाठी ६० हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा केली. मनमोहनसिंग यांच्या निधनानंतर जनतेला त्यांच्या प्रवरानगरमधील घोषणेची व या निर्णयाची प्रकर्षाने आठवण झाली.

# राहुरी कृषी विद्यापीठात नगरपरिषद-नगरपंचायत क्रीडा-सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**राहुरी । प्रतिनिधी**

विकास विभागाच्या अखत्यारित जिल्हास्तरीय नगरपरिषद व नगरपंचायतींच्या अधिकारी-कर्मचारी आयोजन आले असून २७ ते २९ डिसेंबर या कालावधीत नगर परिषद प्रशासनातील खेळाडूंचा हा महोत्सव संपन्न होणार आहे, अशी माहिती नगर परिषद प्रशासनाचे सहआयुक्त प्रशांत खांडकेकर यांनी दिली.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय यांचे निर्देशांनुसार संचालनालयाच्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व अधिनस्तनगरपरिषद नगरपंचायत स्तरावरील अधिकारी-कर्मचारी यांच्याकरिता क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील नगरपरिषद नगरपंचायतींच्या अधिकारी-कर्मचारी स्तरावर क्रीडा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम उद्घाटन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमास इतर जिल्हास्तरीय अधिकारी ही उपस्थिती राहणार आहे.

देवळाली प्रवरा नगरपरिषद मुख्याधिकारी विकास नवाळे, राहुरी नगर परिषद मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपरिषद प्रशासनचे अधिकारी पाहत आहेत. स्पर्धांच्या आयोजनासाठी निवडलेले वैयक्तिक खेळ बॅडमिंटन, टेबलटेनिस, बुद्धिबळ, कॅरम, १०० मीटर; २०० मीटर; ४०० मीटर धावणे, तीन किमी चालणे, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, फ्रीस्टाईल ५० मीटर पोहणे हे प्रकार आहेत. सांघिक खेळात क्रिकेट, रस्सी खेच, रिले ४ १०० मीटर, बॉक्स क्रिकेट (प्रदर्शनीय महिला सहभागासह) याचा समावेश आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात वैयक्तिक गायन, समूह गायन, वैयक्तिक नृत्य, सामूहिक नृत्य, प्रहसन, रांगोळी, कविता वाचन, याचा समावेश आहे.



# गावालगत वाघिणीचा मुक्त संचार; शेतकरी धास्तावले, रात्रीचा वीज पुरवठा बंद

**वर्धा । प्रतिनिधी**

समुद्रपूर तालुक्यातील गिरड परिसरात एका वाघिणीचा आणि तिच्या तीन बछड्यांचा मुक्त संचार सुरू असून, यामुळे स्थानिक शेतकरी व गावकरी भयभीत झाले आहेत. या वाघिणीने काही पाळीव जनावरांवर हल्ले केल्याने भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने सुरक्षा वाढवून २० ट्रॅप कॅमेरे कार्यरत ठेवले आहेत, तसेच अनुचित घटना टाळण्यासाठी रात्रीच्या वेळी वीज पुरवठा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. खुरसापार ते मोहगाव या परिसरात वाघिणीचा वावर असून, ती वर्धा वन क्षेत्रातील असल्याचे वन विभागाने स्पष्ट केले आहे. अपघात टाळण्यासाठी वन परीक्षेत्र अधिकारी नीलेश गावंडे यांनी परिसरातील गावकऱ्यांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. या भागात गस्त घालण्यासाठी वनरक्षक आणि सहाय्यक वन अधिकारी तैनात आहेत.गेल्या काही वर्षांत वाघ, बिबट, आणि अस्वल यांचा वावर गावांजवळ वाढला असून, प्राण्यांच्या भक्ष्याच्या शोधामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. वाघ व बिबट यांचा शहरी आणि ग्रामीण भागातील वावर वाढल्याने वन्यजीवांशी संबंधित अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. वन विभागाकडून सतत परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून, शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना केल्या जात आहेत.



# आबासाहेब काकडे विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## मागील शैक्षणिक वर्षात क्रीडा विज्ञान सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**शेवगाव । प्रतिनिधी**

आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शेवगाव येथे दि. २४ डिसें. ते २७ डिसें. दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले.दि. २४ रोजी कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी पृथ्वीसिंग भैय्यासाहेब काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध मान्यवरांच्या हस्ते चित्रकला, हस्तकला, मेहंदी, रांगोळी तसेच क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले होते. दि.२६ रोजी आबासाहेब काकडे शिक्षण समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.लक्ष्मण बिटाळ यांच्या अध्यक्षतेखाली व शेवगावचे पीएसआय प्रवीणजी महाले यांच्या प्रमुख उपस्थितीत इयत्ता ५वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला .यामध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, कोळी गीते , शेतकरी गीते, नृत्य नाटिका,समाज प्रबोधनपर नाटिका,गायन आदी ९२हून अधिक कलाप्रकार सादर केले .यावेळी सर्व कलाकारांनी आपल्यातील कलागुण सादर करत उपस्थितांची मने जिंकली . शुक्रवार दि.२७ रोजी वर्षभरातील विविध क्रिडा , चित्रकला, रांगोळी,





हस्तकला, मेहंदी, वक्तृत्व , शिष्यवृत्ती,एम.एन.एन.एस. परीक्षा तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला .यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सिने पार्श्वगायक तथा लोककवी प्रा .प्रशांत मोरे, शेवगावचे गटविकास अधिकारी अजितकुमार बांगर ,प्राचार्य संपतराव दसपुते,शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती वंदना पुजारी,शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, शेवगाव पंचायत समिती शिक्षण विभागातील मधुकर घुले, श्रीराम विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे,सुनील काकडे सर,माजी उपमुख्याध्यापिका सौ.मंदाकिनी भालसिंग,सौ सुलोचनाताई मराठे, सरिताताई पुरनाळे,विमलताई सातपुते,संगीता नाईक,उपप्राचार्या रूपा खेडकर, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड,पर्यवेक्षक सुनील आव्हाड, हरिश्चंद्र मडके, शिवाजी पोटभरे, बाबासाहेब लांडगे,रामेश्वर पालवे, म्हातारदेव आव्हाड, शिक्षक प्रतिनिधी बापूसाहेब डमरे, शिक्षका प्रतिनिधी प्रा .सविता पवार,शिक्षकेतर प्रतिनिधी ज्ञानदेव आगलावे,विद्यार्थी - विद्यार्थीनी ,पालक, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच प्रतिनिधी उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रशांत मोरे यांनी विविध विषयावर कविता सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले .त्यांनी विद्यार्थ्यांना लिहिते, गाते व नाचते व्हा तसेच आपल्यातील कलेचे व्यसन करा असा संदेश दिला .सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संपतराव दसपुते यांनी केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ज्ञानेश्वर गरड ,श्रीमती जरीना शेख यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप प्रा.शिवाजी पोटभरे यांनी केला .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग,सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी अजय भांगे यांची निवड

**बीड (प्रतिनिधी):** हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिऱ्यांची ऑनलाईन बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अक्षतेखाली संपन्न झाली.याप्रसंगी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.संजय तुपे यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या सहमतीने व प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मलानी यांच्या निर्देशाने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी अजय भांगे यांची नियुक्ती केली.

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदी अजय भांगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी,प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, प्रदेश उपाध्यक्ष प्रा संजय तुपे,प्रदेश महासचिव



विनोद भोकरे, विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य धनंजय तरारे,राम कोडवते,महेश भैरम,विदर्भ विभागीय अध्यक्ष मो.तारेक शेख,मराठवाडा विभागीय अध्यक्ष शेख वसिम आझाद,नागपूर जिल्हा अध्यक्ष देवेंद्र मुरकुटे, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष मिर्झा अक्रम बेग,वर्धा जिल्हा अध्यक्ष तन्वीर अशरफ,अमरावती जिल्हा अध्यक्ष मुबिन शेख,सोलापूर जिल्हा अध्यक्ष विश्वास चोपडे,धुळे जिल्हा अध्यक्ष विजय चव्हाण, गोंदिया जिल्हा अध्यक्ष गौरव कुमार,वाशिम जिल्हा अध्यक्ष अनिल चाबुकस्वार,औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष अकील काज़ी,जालना जिल्हा अध्यक्ष शबाब बागवान, उस्मानाबाद जिल्हा अध्यक्ष अतिक औटी,रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष वैभव भोसले,बदनापूर तालुका अध्यक्ष इलियास बेग,परतूर तालुका अध्यक्ष शेख महेबुब,भोकरदन तालुका अध्यक्ष अनिस शेख, घनसावंगी तालुका अध्यक्ष अशोक घुमरे, संदिप देवडे आदिंनी त्यांचे अभिनंदन केले.

# कृषीमित्र कोकाट यांची मोफत पीक विम्याची शेतकऱ्यांप्रती आदर भावना

**बीड (प्रतिनिधी):** गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील संध्या मल्टी सर्व्हिसेसचे संचालक तथा कृषीमित्र त्रिंबक (बाबु) कोकाट यांनी रब्बी हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत कोकाट यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारीश्री.सुभास साळवे साहेब गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री.अभय वडकुते सर,बीड सीएससी जिल्हा व्यवस्थापक श्री.दिनेश जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील शेतकरी तसेच शेतकरी गटातील सदस्य यांचे मोफत ३१० शेतकरी यांचे मोफात पीक विमा भरले त्या मुळे शेतकरी यांना दिलासा मिळाला आहे.शेती हा निसर्गावर अवलंबून असणारा व्यवसाय आहे.बऱ्याचदा हवामान बदल किंवा नैसर्गिक आपत्तीचा शेतीवर परिणाम होतो.यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते.शेतकऱ्यांना पिकांची नुकसान भरपाई आणि शेतीला संरक्षण मिळावे, आर्थिक स्थैर्य मिळावे, यासाठी महाराष्ट्र





शासनाने केवळ एक रुपयात पीक विमा योजना मागच्यावर्षी पासून सुरू केली आहे.या योजनेचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा, म्हणून गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील कृषीमित्र बाबु कोकाट यांनी रब्बी हंगाम मधील गहू,हरबरा,ज्वारी,या पिकांचा पीक विमा मोफत काढला व गावातील सर्व शेतकऱ्यांनाही पीक विमाबद्दल जनजागृती केली.२३ डिसेंबर रोजी साजरा होत असलेल्या राष्ट्रीय शेतकरी दिनाच्या निमित्ताने दि.२४डिसेंबर रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.सुभास साळवे साहेब,गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री.अभय वडकुते सर,बीड सीएससी जिल्हा व्यवस्थापक श्री.दिनेश जाधव साहेब यांचा मार्गदर्शनाखाली जातेगाव मंडळ कृषी अधिकारी अश्विनी मस्के मॅडम,कृषी पर्यवेक्षक श्री.पवार सर,कृषी सहाय्यक श्री.प्रकाश वाघमारे,पोटे मॅडम ठाकर आडगाव चे सरपंच श्री.जाधव साहेब,यांच्या उपस्थितीत जातेगाव मंडळ कृषी अधिकारी अश्विनी मस्के यांचा हस्ते शेतकऱ्यांना पिक विमा पावत्यांचे वाटप करण्यात आले.

### ६ जानेवारीला महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळ्यास

# हजारोंच्या संख्येने वाफगांव येथे उपस्थित रहा-दत्ता वाकसे

**वडवणी (प्रतिनिधी):** सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी किल्ले वाफगाव, तालुका खेड जिल्हा पुणे येथे महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक स्मृती दिनानिमित्त सोहळ्यास महाराष्ट्र राज्यातील तमाम धनगर समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंटदत्ता वाकसे यांनी केले आहे. पक्ष, संघटना, पोटजाती, आपसातील हेवेदावे, विसरून एक सामाजिक जाणिवेतून आपण फक्त धनगर आहोत या जाणीवेने धनगर समाज बांधवांनी एकत्र येऊन चक्रवर्ती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक स्मृती दिनानिमित्त सोहळ्यास उपस्थित राहून एका ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार व्हावे. शूर, लढवय्ये यशवंतराव होळकर यांचे आपण बारसदार असल्याचा अभिमान धनगर समाज बांधवांनी उराशी बाळगला पाहिजे. चक्रवर्ती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर हे छत्रपती शिवरायांच्या नंतरचे एकमेव असे राजे आहेत की, त्यांनी आपल्या वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी म्हणजे ६ जानेवारी १८०५ रोजी वैदिक पद्धतीने आपला राज्याभिषेक केला. किल्ले वाफगाव या ठिकाणी येत्या ६ जानेवारी २०२५रोजी महाराजा यशवंतराव होळकर यांच्या मूर्तीवर




होळकर राज परिवार, प्रमुख लोकप्रतिनिधी हस्ते व प्रमुख संघटना प्रतिनिधीच्या उपस्थितीत किंतू परंतु, न ठेवता उपस्थित राहण्याचे आवाहन भूषण सिंह राजे होळकर यांनी केले आहे. आणि अशाच प्रकारचे आवाहन शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी तमाम महाराष्ट्र राज्यातील धनगर समाज बांधवांना केले आहे.होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंह राजे होळकर यांच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून महाराजा चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित केला जातो या कार्यक्रमाला राज्यभरातील होळकर घराण्याचे माहेरकडील सासरकडील वंशज उपस्थित राहतात.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भात रविवारी शिवसेनेची जिल्हा बैठक : जगताप, मुळूक, गलधर

**बीड (प्रतिनिधी):** बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. या संदर्भात रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक सकाळी अकरा वाजता हॉटेल ग्रॅड यशोदा येथे आयोजित करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री







एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी बीड जिल्हा शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल ग्रॅण्ड यशोदा येथे आयोजित केली आहे. बैठकीस जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी महिला आघाडी युवासेना शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटना आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने महिला आरोग्य तपासणी शिबिर

**परळी (प्रतिनिधी):** राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक जागृती पंधरवडा अखिल भारतीय ग्राहक पंचायत परळी वैजनाथ तालुका शाखेच्या वतीने विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात येत आहे त्यामध्ये दिनांक २६ डिसेंबर रोजी महिला आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शेकडो महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गुरुवार दिनांक २६ डिसेंबर रोजी परळी उपजिल्हा रुग्णालय येथे सकाळी दहा वाजता या आरोग्य तपासणी शिबिराचा मान्यवरांच्या उपस्थिती शुभारंभ झाला. दिवसभर चाललेल्या या शिबिरात शेकडो महिलांच्या आरोग्याचे तपासणी तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर अरुण गुट्टे ,डॉक्टर यमुना गायकवाड, डॉक्टर ऐश्वर्या कोकाटे, सविता चाटे ,प्रीती वावळे ,संजय नागरगोजे ,अविनाश वावळे ,नंदिनी भातांगळे, गुड्डेराव जळकोटे अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या अध्यक्षा चित्रा देशपांडे, संघटन मंत्री विजया दहिवाळ, उपाध्यक्ष तारावती अग्रवाल, सदस्य संध्या सरोदे, सुनिता बोडके, रुक्मिणी अग्रवाल आदी उपस्थित होते.

# दहिवाळ सराफच्या बक्षिसांची सोडत जाहीर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नवनागापूर एमआयडीसी येथील दहिवाळ सराफ खरवंडीकर दालनात दिवाळी व पाडव्यानिमित्त ग्राहकांसाठी बक्षीसांची लयलूट ऑफर ठेवण्यात आली होती. या योजनेनिमित्त सोने-चांदी खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या कुपनची सोडत काढण्यात आली. यामध्ये गुलमोहर रोड येथील पुष्पलता महादेव जाधव मोपेड बाईकचे भाग्यवान विजेत्या ठरल्या. तर सोडत मधील २१ भाग्यवान विजेत्यांना सोन्याची नथ, पैठणी साड्या व चांदीचे नाणे बक्षीसे देण्यात आले.

दिवाळी व पाडव्यानिमित्त दहिवाळ सराफ खरवंडीकर दालनात दहा हजार रुपये पुढील खरेदीवर ग्राहकांना लकी ड्रॉ कुपन देण्यात आले होते. या जमा झालेल्या कुपनची सोडत नुकतीच काढून भाग्यवान विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी ह.भ.प. माळवदे महाराज, नवनाथ दहिवाळ, सचिन दहिवाळ, नितीन दहिवाळ, अरुणा दहिवाळ, शितल दहिवाळ, पूजा दहिवाळ, साईराज दहिवाळ, स्वरा दहिवाळ, ओवी दहिवाळ, देवांश दहिवाळ, शंभू दहिवाळ, संतोषी भिसे, प्रिया मद्दा, रिजवाना बागवान, शितल कानडे, दिपाली बंगाळ, साक्षी पवार, प्रिया गवांदे, बंडू भिसे आदींसह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

भाग्यवान विजेते ठरलेले सार्थक बाबासाहेब कदम, शैलेश शिंदे यांना सोन्याची नथ, चंदा तुपे, तुषार दौंड यांना पैठणी साड्या तर पदम झुंबर, झांजे या विजेत्यांना चांदीचे नाणे बक्षीस स्वरुपात देण्यात आले. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या, यामधील विजेत्यांना देखील आकर्षक बक्षिसे देण्यात आली.दहिवाळ सराफ खरवंडीकर यांचे नवनागापूर (रेणुका स्कूल जवळ), पाईपलाइन रोड (यशोदा नगर कमानी समोर), खरवंडी (ता. पाथर्डी) व धनकवडी (जि. पुणे) येथे चार शाखा कार्यरत आहे. या चारही शाखेमध्ये महिला दिन व विविध सण-उत्सव काळात खरेदीवर विविध ऑफर ठेवण्यात येते.